# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

**(सकाळ)**

जा.क्र. २०२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २०/०४/२०१८

**१) टॉवर लाईनचा कॉपर बॉन्डची चोरी :-**

दिनांक ०३/०४/२०१८ चे १७.०० वाजता ते दि. १८/०४/२०१८ चे ११.०० वाजता दरम्यान यातील कोणीतरी अज्ञात चोराने ४०० के. व्ही.डी.सी. तिरोडा ते वरोरा पारेषण टॉवर लाईनचा (टॉवर पोलचे ) कॉपर बॉन्ड (वायर) एकुण २४ नग प्रति नग ८७५/रु. चा माल चोरून नेल्याने, फिर्यादी विजय कुमार रामलखन सिंह वय ४० वर्ष रा. प्लॉट क्र. ०२ गजानन नगर सरदार पटेल वार्ड वरोरा जि. चंद्रपुर ह.म. साई कॉलोनी तिरोडा यांचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बाहदुरे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**२) ट्रॅक्टर टॉली पलटी होवुन इसमाचा मृत्यु :-**

दिनांक १९/०४/२०१८ चे १७.३० वाजता यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ट्रॅक्टर व टॉली मधील माती रोडाचे खडयात खाली करतांनी आजुबाजुला न पाहता ट्रॅक्टरचे ट्रॉलीतील माती खाली करीत असतांना खड्डा असल्याने ट्रॉली पलटी होवुन टॉलीतील माती मृतक रामचंद्र वडगुजी कोचे वय ७५ वर्ष रा. तात्या टोपे वार्ड भंडारा. ह. मु. धारगाव यांचे अंगावर पडल्याने तो दबुन मरण पावला, त्याचे मरणास ट्रॅक्टर चालक आरोपी हा कारणीभुत झाल्याने फिर्यादी सौ. मानसी मनिष कोटांगले वय ३५ वर्ष, रा. धारगाव यांचे तोंडी व डॉक्टरी मेमो वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ३०४(अ) भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. नवखरे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**३) पॅन्टच्या खिश्यातुन पैश्याची चोरी :-**

दिनांक १८/०४/२०१८ चे १५.०० ते १८.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी शंकर बाळसुराम वासनिक वय ४६ वर्ष, रा. गांधी वार्ड वरठी याने घर बांधणीचा ठेका घेतला असुन त्या घराचे किचन रुम मध्ये पॅन्टच्या खिश्यात १०,०००/-रु. ठेवुन सदर पॅन्ट खिळयाला लटकवुन मजुरासोबत घराच्या बाहेरील दिवालीला प्लॉस्टर करीत असता कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन फिर्यादीच्या पॅन्टचे खिश्यातुन १०,०००/-रु. चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भाजीपाले पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

**४) मोबाईलची चोरी :-**

दिनांक १९/०४/२०१८ चे १८.१५ ते १८.३० वाजता यातील फिर्यादी व त्याचा मित्र विरु पाक्स रंगारी वय ४८ वर्ष, रा. माहात्मा फुले वार्ड भोजापुर हे दोघेही मिळुन बेला येथे आठवडी बाजार करण्यास गेले असता, फिर्यादी व त्याचे मित्राचे शर्टचे वरच्या खिश्यात ठेवलेले व्ही. आय. व्हीओ. व्ही ७ काळया रंगाचा मोबाईल किंमती २१,९९०/-रु. २) एमआय रेड मी नोट -४ कंपनीचा सोनेरी रंगाचा मोबाईल किंमती १०,९९९/-रु. असा एकुण ३२,९८९/-रु. चा माल कोणीतरी अज्ञात चोराने नेल्याने फिर्यादी पुष्पक दयाकर रामटेके वय ३२ वर्ष, रा. तकीया वार्ड अंबीका नगर भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. चेके पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**५) संगनमत करुन पर्स मधुन नगदी पैसे, व सोन्याचे दागीण्यांची चोरी :-**

दिनांक १९/०४/२०१८ चे १६.४० वाजता दरम्यान यातील फिर्यादी व सौ. प्रमीला वैद्य ही बस मध्ये चढत असतांनी दोन अनोळखी महिला आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीचे पर्स मध्ये ठेवलेले नगदी ४६,०००/-रु, व सौ. प्रमीला वैद्य हिच्या पर्स मधील १ सोन्याचा मंगळसुत्र १ सोन्याची चंपलाकठ्ठी ३ तोळे, किंमती ६०,०००/-रु. असा एकुण १,६४, ६००/-रु. चा माल काढुन चोरुन नेल्याने फिर्यादी सौ. रश्मि रमेश कडू वय ५० वर्ष, रा. विठ्ठल गुजरी वार्ड पवनी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३७९,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कटारे पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**६) महिलेस अश्लिल शब्दात शिवीगाळ केल्याने गुन्हा नोंद :-**

दिनांक १८/०४/२०१८ चे १९.४५ वाजता यातील फिर्यादी ही तिचे पतीचे शेतातुन येण्याची वाट पाहत असतांनी यातील आरोपीने फियादीकडे पाहुण अश्लिल हावभाव करुन तसेच अश्लिल शब्दात शिवीगाळ केल्याने फिर्यादींचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २९४,५०९,५०४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. रहांगडाले पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**७) अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन कुऱ्हाडीने मारण्यास धावल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ०८/०४/२०१८ चे २०.०० ते १८/०४/२०१८ चे १०.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी व आरोपी हे भावसुन व भासरे असुन यातील आरोपी हा दारु पिवुन फिर्यादीस पाहुण शिवीगाळ केली, असता फिर्यादीने कश्याला शिवीगाळ करता असे म्हणुन हटकले, असता आरोपीने फिर्यादीस अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन तु माझ्या बायकोला शिकवतेस? असे म्हणुन अश्लिल शब्दात बोलुन शिवीगाळ केल्याने फिर्यादी व फिर्दिचे मुलास कुऱ्हाड घेवुन मारण्यास धावुन आला असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम २९४,५०९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. बिसने पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**८) अवैध दारु /जुगार अडड्यांवर धाडी . :–**

दिनांक १९/०४/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन भंडारा, कारधा, वरठी, तुमसर, लाखनी, पालांदुर, साकोली, पवनी, व दिघोरी येथे अवैध हातभट्टी +देशी दारू/जुगार अडड्यावर धाडी घालुन एकुण १२ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ११० लिटर हातभंट्टी दारू + ९०० किलो सडवा मोहा+ साहित्य किंमती ६२,३६२/रु. व १७ लिटर १८० मिली लिटर देशी दारु + १ मोटार सायकल किंमती ३०,२८०/–रु. तसेच जुगारातुन ३,८९०/रु. असा एकुण किंमती ९६,५३२/–रु. चा माल जप्त करण्यात आला.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ०७१८४२५४७०१

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.